

विश्वसनीय वृत्तपत्र म्हणून
‘सकाळ’ची ओळख आहे.
त्यामुळे २४ पानांचा भरगच्च
‘सकाळ’ मी वाचतो,
तुम्हीही वाचा.
– डॉ. देवानंद शिंदे,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# धोरण बदलणारे संशोधन हवे

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिक्षण आणि संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. उच्च शिक्षणातील संशोधनाला तर फार मोठे महत्त्व आहे. त्यामुळे कोणत्याही विषयात होणारे संशोधन नवी धोरणे ठरवताना महत्त्वाचे ठरेल, अशा उच्च दर्जाचे व्हायला हवे,' अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

## प्रकुलगुरू डॉ. शिर्के यांची अपेक्षा

इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्च आणि शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाच्यावतीने आयोजित 'कपॅसिटी बिल्डिंग प्रोग्राम'चा समारोप डॉ. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थित झाला. त्यावेळी ते बोलत होते. कोर्सचे समन्वयक आणि विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे आणि सहसमन्वयक प्रा. अविनाश भाले यावेळी उपस्थित होते.

विद्यापीठीय किंवा कोणत्याही क्षेत्रात असलेल्या संशोधकांचा ध्यास बदलाच्या प्रेरणा निर्माण करणारा असावा, अशी अपेक्षा व्यक्त करून डॉ. शिर्के म्हणाले, 'संशोधक आणि संशोधनाचे विषय निश्चित दिशेने जावेत, यासाठी कपॅसिटी बिल्डिंग वर्कशॉप अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. संशोधनाची नीतीमूल्ये जपतानाच त्यातील गांभीर्यही जपले जाईल, याची काळजी घेणेही तितकेच गरजेचे आहे. आपले संशोधन केवळ परिसरापुरते मर्यादित न राहता ते आंतरराष्ट्रीय पातळीवर कसे जाईल, याचा वस्तुपाठही अशा वर्कशॉपमधून मिळतो, म्हणून ही वर्कशॉप महत्त्वाची ठरतात.'

प्रा. डॉ. जगन कराडे यांनी स्वागत केले. डॉ. शिर्के यांच्याहस्ते प्रा. कराडे व प्रा. भाले यांचा सत्कार करण्यात आला.



आयसीएसएसआर आणि समाजशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'कपॅसिटी बिल्डिंग प्रोग्राम'मधील सहभागींना प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे व प्रा. अविनाश भाले यांच्यासह सहभागी संशोधक विद्यार्थी.

लोकमत

### शिवाजी विद्यापीठ राबवणार : परिषदेबाबतची कागदपत्रे, छायाचित्रे जमा करण्याचे आवाहन

# माणगाव परिषद शताब्दीनिमित्त वर्षभर उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** माणगाव परिषदेच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठासह माणगाव येथे विविध उपक्रम राबविण्यात येतील, अशी घोषणा प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी बुधवारी केली.

विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने माणगाव परिषद शताब्दी वर्षाचे औपचारिक उद्घाटन डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे प्रमुख उपस्थित होते. यावेळी जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर म्हणाले, माणगाव येथे २१-२२ मार्च १९२० रोजी बाबासाहेबांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृतांची पहिली परिषद झाली. त्यानंतर दि. ३०-३१ मे १९२० रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय अस्पृश्य परिषद झाली. त्या दोन परिषदा या दोघांचे विचार व स्नेहसंबंध समजून घेण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. भारताच्या सामाजिक चळवळीला या दोन व्यक्तिमत्त्वांनी प्रदान केलेले अधिष्ठान, प्रेरणा अत्यंत महत्त्वाच्या आहेत; त्यांचा संशोधकीय अभ्यास होणे गरजेचे आहे. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. रत्नाकर पंडित, ज्येष्ठ पत्रकार जयसिंग पाटील, सर्जेराव पद्माकर, आनंद खामकर, आदी उपस्थित होते. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले.



**शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे माणगाव परिषदेच्या शताब्दी वर्षाचे औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बुधवारी झाले. शेजारी डावीकडून डी. जी. कणसे, विलास नांदवडेकर, श्रीकृष्ण महाजन उपस्थित होते.**

## पहिले व्याख्यान उद्या

माणगाव परिषदेबाबत कागदपत्रे, छायाचित्रे, आठवणी यांचे संकलन करण्याचा प्रकल्प आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे प्रस्तावीत करण्यात आला आहे. ज्यांच्याकडे त्या संदर्भातील कागदपत्रे असतील, त्यांनी ती केंद्राकडे सुपूर्द करावीत, असे आवाहन डॉ. महाजन यांनी केले. केंद्रातर्फे वर्षभर विविध व्याख्यानांचे आयोजन केले जाणार आहे.पहिले पुष्प प्रा. विनय कांबळे हे शनिवारी (दि. २३) सकाळी साडेदहा वाजता गुंफणार आहेत.

पुढारी

# वाणिज्य शाखेमध्ये रोजगार निर्मितीच्या संधी : डॉ. कामत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

वाणिज्य शाखेमध्ये रोजगार निर्मितीच्या अनेक संधी असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी केले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्सतर्फे आयोजित पदवीप्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम होत्या.

डॉ. कामत म्हणाले, वाणिज्य शाखेमध्ये असलेल्या विविध क्षेत्रामध्ये अनेक संधी प्राप्त होत आहेत. या ज्ञान शाखेबरोबर कौशल्य विकासावरील शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे. अध्यक्षा मगदूम यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी शिवाजी विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. एन. उलपे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रसाद कामत, सदस्य ॲड. व्ही. एन. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, डॉ. बी. जे. नेर्लेकर, डॉ. के. जी. कांबळे उपस्थित होते.

महाविद्यालयातील बी.कॉम, बी.बी.ए., एम.कॉम., एम.बी.ए. या विद्याशाखेतील ४९८ गुणवंत विद्यार्थ्यांनी पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र स्वीकारले. प्रा. सुप्रिया चौगुले व प्रा. सीमा बेनाडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

# भगवान महावीर अध्यासन केंद्रातर्फे २७, २८ रोजी राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ भगवान महावीर अध्यासन केंद्रातर्फे 'भगवान महावीर व महात्मा गांधी यांच्या विचारांची सद्यकालीन आवश्यकता' या विषयावर दि. २७ व २८ रोजी राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. व्ही. बी. ककडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. परिषदेचे उद्घाटन दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. याप्रसंगी उद्योजक सुरेंद्र जैन, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत. परिषदेतील चर्चासत्रात आहिंसा व सद्यकालीन संदर्भ, दहशतवाद आणि धर्म, विश्वस्त आणि विषमता, सत्य, तत्त्व आणि व्यवहार, जैन तत्त्वज्ञानाचा महात्मा गांधी यांच्या जीवनावरील परिणाम आदी विषयांवर तज्ज्ञांची व्याख्याने होणार आहेत. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील, जिवंधर चौगुले, संजय शेटे, सुरेश रोटे, प्राचार्य डॉ. आर.पी. लोखंडे आदी उपस्थित होते.

22 MAR 2019
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**दर दोन वर्षांनी पुरस्कार वितरण : पाटील कुटुंबीयांकडून शिवाजी विद्यापीठाला पाच लाखांचा निधी सुपूर्द**

# दर्जेदार समीक्षा ग्रंथास 'म. सु. पाटील'ने गौरविणार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : ख्यातनाम समीक्षक व ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. म. सु. पाटील यांचे कुटुंबीय आणि शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरतर्फे दर दोन वर्षांनी 'डॉ. म. सु. पाटील पुरस्कार' हा दर्जेदार समीक्षा ग्रंथास दिला जाणार आहे.

समीक्षा, वैचारिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी म. सु. पाटील कुटुंबीयांच्या वतीने पाच लाख रुपये विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले आहे. या देणगी रकमेच्या व्याजातून हा पुरस्कार दिला जाणार आहे. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, म. सु. पाटील कुटुंबातील कवयित्री नीरजा, शंकर अय्यर, तृप्ती शंकर, अनुराधा मोकल, वित्त व लेखा अधिकारी व्ही. टी. पाटील, प्राचार्य कणसे, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस, रणधीर शिंदे हे उपस्थित होते.



ख्यातनाम समीक्षक डॉ. म. सु. पाटील यांच्या नावाने पुरस्कार सुरु करण्यासाठीचा पाच लाखांचा निधी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी शेजारी नीरजा, शंकर अय्यर, तृप्ती शंकर, अनुराधा मोकल, व्ही. टी. पाटील, प्राचार्य कणसे, व्ही. एन. शिंदे, राजन गवस, रणधीर शिंदे, आदी उपस्थित होते.

## 'तृष्णाबंध'ला भारतीय साहित्य शास्त्रात महत्त्व

म. सु. पाटील हे मराठीतील नामवंत समीक्षक असून, मनमाड (खानदेश) महाविद्यालयात दीर्घकाळ प्राचार्य म्हणून काम केले आहे. त्यांचे दहाहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मराठी समीक्षा लेखन परंपरेत त्यांनी केलेली समीक्षा मूलभूत स्वरुपाची आहे. मराठी वाङ्मयीन नियतकालिकांच्या विस्तारात त्यांचा महत्वाचा सहभाग होता. प्राचीन कवितेसह आधुनिक कवितेची समीक्षा महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी मांडलेला तृष्णाबंध साहित्यविचार भारतीय साहित्यशास्त्रात महत्त्वाचा गणला गेला आहे.